संक्षिप्त फौ.ख.क्र.१९९/२०२१
नि.क्र. २२ लगत

(प्रकरणामध्ये स्टे नाही असे उभयपक्षाचे वकीलांनी कथन केले आहे म्हणून पुढील सरतपास शपथेवर सुरु.निशाणी १६ वरील आदेशान्वये सांगितलेली रक्कम आरोपी भरण्यास तयार आहे असे आरोपीच्या वकिलांनी कथन केलेले आहे. )

**फिर्यादीतर्फे सा. क्र.१ भावीन देवीलाल सोनी यांचा शपथेवर पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्रीमती. गुलाब ढीमर यांच्या मार्फत –**

१. मी दाखल केलेले नि नं.३ सोबत दाखल केलेला इन्वाहईस व्हाऊचर मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. ( सदर ईन्वहाईस **नि.क्र.पी– २३/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.) मी दाखल केलेले नि नं.३ सोबत दाखल केलेली वकिलांची नोटीस मला दाखवण्यात आला. त्यावर वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (निशाणी देण्यापुरते आरोपीचे वकिलांचा आक्षेप नसल्याने सदर नोटीसला **नि.क्र.पी–२४/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.) मी दाखल केलेले नि नं.३ सोबत दाखल केलेली वकिलांची नोटीस पाठवल्या बद्दलची मुळ पोस्टाची रिसिप्ट व पोचपावती कार्ड मला दाखवण्यात आला. (निशाणी देण्यापुरते आरोपीचे वकिलांचा आक्षेप नसल्याने सदर पोस्टाची रिसिप्ट व पोचपावती कार्ड **नि.क्र.पी– २५/पी.डब्ल्यू.१** व **नि.क्र.पी– २६/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.)

२. मी दाखल केलेले नि क्र.२२/१ सोबत दाखल केलेला मुळ चेक मला दाखवण्यात आला. त्यावर आरोपीची सही आहे. सही माझ्या समोर केलेली आहे. (मुळ चेक असल्याने सदर चेक ला **नि.क्र.पी– २७/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.) मी दाखल केलेले नि नं.२२/१ सोबत दाखल केलेला मुळ चेक रिटर्न मेमो मला दाखवण्यात आला. त्यावर बँकेचा सही शिक्का आहे. (मुळ मेमो असल्याने सदर मेमोला **नि.क्र.पी–२८ /पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.) मी दाखल केलेले नि नं.२२/१ सोबत दाखल केलेला ईन्वाहसची मुळ प्रत मला दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. दोन मुळ प्रत होत्या, आरोपीला एक दिली व हि दुसरी माझ्याकडे ठेवली. त्यातील मजकुर बरोबर आहे. ( सदर ईन्वाईसला **नि.क्र.पी– २९/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.)

**सरतपास पूर्ण**

## आरोपीतर्फे श्री.ए.एम.पाटील यांच्या मार्फत सा.क्र.१ फिर्यादी यांचा उलटतपास

१. मला इंग्लीश वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात आरोपीने काय बनवून घेतले होते याचे डिटेल नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, बिल मध्ये नमुद आहे. (साक्षीदार यांना निशाणी क्र. १ व २२ दाखवण्यात आले) या मध्ये मालाची डिटेल नमूद नाही.

२. मी वकिलांना फिर्याद देताना माला बद्दल सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की,माझ्या सांगण्याप्रमाणे फिर्याद लिहिली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, बिल दिले होते. रक्कम नमुद आहे. आरोपीला माझा मित्र कमलेश खरात घेवून आला होता. दागिने बनवायला दिल्यावर आम्ही अॅडव्हान्स घेतो. ६० ग्रॅम ४१० मिली.ग्रॅम चे दागिने बनवायला दिले होते, अंगठी वगैरे. बरेच वर्षे झाल्याने स्पेसीफिक काय वस्तु होती हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतात की, बिल मध्ये सगळे नमुद आहे. कमलेश खरातला मी लहाणपणापासून ओळखतो.

३. (साक्षीदार यांना निशाणी क्र.२३ दाखवण्यात आले) सदरचे कागदपत्र हे झेरॉक्स आहे, ओरीजनल नाही. मला दाखविलेल्या निशाणी २४ वर माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दाखविलेला निशाणी २७ वरील चेक आरोपीने मला दिला नव्हता.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी व कमलेश खरात हे रॅकेट चालवत आहे व ब्लँक चेक घेवून खोटे केस दाखल करत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, अशा खोटया केसेस कोर्टात दाखल आहेत. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, आम्ही व्यापार करतो, खरातच्या दोन केस आहेत. माझी ही केस आहे. बाकी कोणाच्या आहेत मला माहित नाही.

५. प्रशन – दागिने देतांना पैसे बाकी असतांना कस्टमरची बिलवर तशी सही घेता का ?

उत्तर – कधी–कधी सही घेतो, कधी–कधी नाही घेत.

६. आरोपीने मला अॅडव्हानस दिला नव्हता. (साक्षीदार यांना निशाणी क्र. २९ दाखवण्यात आला) त्यावर आरोपीची रिसीव्हड म्हणून सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरात कडे असलेल्या खोटया चेकने सदरची केस दाखल केली आहे.

साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, खरातने तो चेक मला दिलाच नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही लिहिलेल्या बिल मध्ये नमुद असल्याप्रमाणे दागिने आरोपीला आम्ही कधीही दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, म्हणून बिलची मुळ कॉवी आरोपीला दिली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, दोन कॉपी असतात, एक ओरीजनल आमच्याकडे आणि एक आरोपीला दिली होती. (साक्षीदार यांना निशाणी क्र. २९ पुन्हा दाखवण्यात आले) हे म्हणणे खरे आहे की, सदरची प्रत कंम्पयुटराईज आहे. हे म्हणणे खरे नाही की, कंम्पयुटराईज असल्याने कितीही प्रत काढता येतात. साक्षीदार स्वतःहुन सांगातात की, त्यावर नंबर असतो, जीएसटी असते तसे करता येत नाही, दर महिन्याला जीएसटी फाईल करावी लागते, जीएसटीचा या केसशी संबंध नसल्याने जीएसटीची कॉपी केस कामी दाखल केली नाही. हवी असल्यास सीए कडून मागवून दाखल करण्यास तयार आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कधीही दागिने विकत घेण्यासाठी आमच्याकडे आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, म्हणून आरोपीने कधीही चेक दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्यात खोटे सांगितले आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाकरला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Digitally signed by PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR Date: 2025.07.28 16:10:38 +0530

**(श्रीमती पी.एस.जी.चाळकर)**

दि. २८/०७/२०२५ २रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पालघर